# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** कोडोली
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0036 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**12/02/2025 11:15

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 12/02/2025
**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 12/02/2025
**Time From (वेळेपासून):** 11:15 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:05 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 12/02/2025 **Time (वेळ):** 18:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 005
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 13/02/2025 02:52 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 3 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** मंडळ अधिकारी कार्यालय , कोडोली, ,ता पन्हाळा,

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** अमरसिंह आनंदाराव घाटगे

(b) **Father's Name (वडील चे नाव) :** आनंदाराव घाटगे

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1990

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | घाटगे केकरे मळा,कोडोली,ता पन्हाळा,कोडोली,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | घाटगे केकरे मळा,कोडोली,ता पन्हाळा,कोडोली,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9921727998

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अरूण भानुदास माळगे | | वडील का नाम : भानुदास माळगे | 1. कचरे गल्ली, ,,इस्लामपूर,ता वाळवा,इस्लामपूर,सांगली, महाराष्ट्र,भारत |
| 2 | योगेश यशवंत गावडे | | वडील का नाम : यशवंत गावडे | 1. शिनगारे गल्ली, ,कोडोली, ,ता पन्हाळा,,कोडोली,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत |
| 3 | सुशांत सुभाष चौगुले | | वडील का नाम : सुभाष चौगुले | 1. शहापूर, ,ता पन्हाळा,कोडोली, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रूपया | 500 रूपये दराच्या 4 भारतीय चलनी नोटा | 2,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

2,000.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक - 13/02/2025

मी अमरसिंह आनंदाराव घाटगे, वय-35 वर्षे ,व्यवसाय व्यापार,रा.घाटगे केकरे मळा,कोडोली,ता.पन्हाळा, जिल्हा कोल्हापुर मोनं 9921727998 समक्ष पोलीस ठाणेस हजर राहुन फिर्याद देतो की,

मी दिनांक 11/02/2025 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर येथे पोलीस उपअधीक्षक वैष्णवी पाटील यांना समक्ष भेटुन माझेकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत तक्रार सांगीतली की, मी वरील पत्यावर कुटंुबासोबत एकत्रीत राहण्यास आहे. माझे वडील आनंदराव शामराव घाटगे यांचे नावे काडोली ता.पन्हाळा येथे गट नं 1375 मध्ये एकुण 70.47 गुंठे जमिन असुन त्यातील 10 गुंठे जमिन ही माझी आई सौ शांता आनंदा घाटगे हीचे नावे बक्षीसपत्रव्दारे केली सदर बक्षीसपत्र हे पन्हाळा रजीस्टर कार्यालय येथे दिनांक 10/01/2025 रोजी केले होते. दिनांक 11/02/2025 रोजी मी माझे दुकानामध्ये असताना योगेश गावडे नावचा व्यक्ती दुकानात आला त्यावेळी त्याने त्याची ओळख सांगुन तो सर्कल अरूण माळगे यांचेकडे काम करत असल्याचे सांगुन तुमचे गट नं 1375 ची बक्षीस पत्राची नोंद घालण्याचे काम आमचे कोडोली मंडळ अधिकारी कार्यालयाकडे आल्याचे सांगुन बक्षीसपत्राप्रमाणे नोंद घालण्यासाठी 2500/- रू हे सर्कल माळगे व त्यांचेकरीता दयावे लागतील असे म्हणुन माझेकडे 2500/- रूपयांची मागणी केली त्यावेळी मी त्यांना ठिक आहे नंतर येवुन भेटतो असे सांगितले. सर्कल आॅफीस कोडोली येथे काम करणारा योगेश गावडे हा स्वतःकरीता व सर्कल माळगे यांचेकरीता माझेकडे मागत असलेले 2500/- रूपये हे लाच म्हणुन मागणी करीत असलेची माझी खात्री झाली आहे. परंतु त्यांना लाच रक्कम देणेची माझी ईच्छा नाही. तरी त्यांचेवर आपणा कडुन कारवाई व्हावी म्हणुन तक्रार अर्ज दिला. मी दिनांक 12/02/2025 रोजी सकाळी 11.00 वा चे सुमारास गावडे व माळगे यांना भेटणेसाठी मंडळ अधिकारी कार्यालय कोडोली येथे जाणार असलेचे सांगीतले. त्यावेळी पाटील मॅडम यांनी पोलीस निरीक्षक बापु साळुंके यांना बोलावुन घेवुन ते पुढील कारवाई करतील असे सांगितले. त्यावेळी मी साळंुके साहेबांना माझी वरीलप्रमाणे तक्रार सांगितली. त्यावेळी साळुंके साहेबांनी मला ते दिनांक 12/02/2025 रोजी कोडोली बोरपाडळे रोडवर दुर्गेवाडी वस्ती शेजारील मोकळ्या जागी येणार असल्याचे सांगितले. दिनांक 12/02/2025 रोजी मी व साळुंके साहेब एकमेकांचे संपर्कात होतो. सांळुके साहेब यांनी ते दुर्गेवाडी वस्ती येथे आल्याचे सांगुन त्यांनी मला ते थांबलेले ठिकाणी बोलाविले. त्यानंतर मी तेथे जावुन साळुंके साहेब यांना भेटलो. त्यावेळी साळुंके साहेबांनी मला शासकीय दोन्ही पंच, स्टाफ यांची ओळख करून दिली त्यांचे सुचनेवरून पंचानी मला माझी तक्रार विचारली त्यावर मी त्यांना वरील प्रमाणे माझी तक्रार सांगीतली.

त्यानंतर साळुंके साहेबांनी पुढील कारवाई येथुनच करण्याचे आहे असे सांगीतले. साहेबांनी त्यांच्याकडील व्हाईस रेकाॅर्डर दाखवुन त्याची संपुर्ण माहिती मला तसेच पंचाना देवुन मंडळ अधिकारी कार्यालयात काम करणारे गावडे व मंडळ अधिकारी माळगे यांची लाच मागणीचे अनुषंगाने पडताळणी करण्याचे असलेने आवश्यक सुचना देवुन साहेबांनी त्यांचेकडील व्हाईस रेकाॅर्डर चालु करून तो माझ्या गळयात अडकवुन मला व पंच नं.1 गवते यांना माझेकडील मोटर सायकल क्र.एम.एच. 09 - डी क्यु - 6864 वरून मंडळ अधिकारी कार्यालय कोडोली येथे पाठविले. मी व पंच कार्यालयात गेलो तेथे मी माझे वरील मोबाईल क्र. वरून घाटगे यांचे मोबाईल क्र.

7058826894 वरती फोन केला त्यावेळी योगेश याने तो बाहेर असुन आ◌ॅफीस मध्ये बंदु नावाचे इसमास भेटणेस सांगितले. त्यावेळी योगेश "त्याला म्हणा, काल योगेश ने बोलेल्यालं, ते घेवून आलोय, ते मी जरा बाहेर "असे म्हणाले. त्यावेळी मी माळगे साहेबांचे बाबत विचारणा केली असता योगेश याने ते आलेले नाहीत असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना फोन करून विचार कधी येणार आहेत ते असे सांगितले. त्यावेळी योगेश याने विचारून दुपारी फोन करतो असे म्हणाले. त्यानंतर मी बंदु यांना भेटलो त्यावेळी मी "तुम्हीचं होय, योगेश म्हणाला, तुम्हाला भेटा, घाडगे साहेब कधी येणार आहेत."असे म्हणालो. त्यावेळी बंदु "दुपारी"असे म्हणाले. त्यानंतर मी व पंच परत येवुन साळुंके साहेबांना घडलेली हकीकत सांगितली. माळगे व घाटगे हे दुपारी आ◌ॅफीसमध्ये येणार असल्याने त्याची पडताळणी दुपारी करण्याचे ठरले.

मी मंडळ अधिकारी माळगे व गावडे हे कार्यालयात आल्याचे खात्री करून साळुंके साहेबांना सांगितले. त्यावेळी साळुंके साहेबांनी गावडे व मंडळ अधिकारी माळगे यांची लाच मागणीचे अनुषंगाने पडताळणी करण्याचे अनुषंगाने आम्हाला सुचना दिल्या. त्यानंतर त्यांचेकडील व्हाईस रेका◌ॅर्डर चालु करून तो माझ्या गळ्यात अडकवुन मला व पंच नं.1 गवते यांना मंडळ अधिकारी कार्यालय कोडोली येथे पाठवुन दिले. मी व पंच मंडळ अधिकारी कार्यालयात गेलो त्यावेळी मी तेथे योगेश आहे का याबाबत माहिती घेतली असता तो बाहेर गेला होता म्हणुन मी माझे वरील मोबाईल वरून त्यांचे मोबाईल वरती फोन केला असता त्याने मला सर्कल साहेबांना भेटायला सांगितले व ते दहा पंधरा मिनटात येत असल्याचे सांगितले. त्यानंतर मी बंदु यांना भेटुन योगेश बाहेर गेला आहे काय असे विचारले असता त्यानी तो बाहेर गेला असल्याचे सांगितले. त्यानंतर काहीवेळाने गावडे कार्यालयात आले त्याना मी माझेकडे बोलावुन घेतले. त्यावेळी आमचेत माझे कामाचे अनुषंगाने बोलने झाले. त्यावेळी योगेश " मी सांगितलयं की, तुम्हाला ते, मी म्हणालो मला म्हटलं " असे म्हणाले. त्यावेळी मी "किती किती .... किती" असे म्हणालो त्यावेळी योगेश " अडीच हजार सांगितलेलं " असे म्हणाले. त्यावेळी मी "अडीच" असे म्हणालो त्यावेळी योगेश व्हय असे म्हणाले. त्यावेळी मी "कमी काय" असे म्हणालो . त्यावेळी योगेश याने "तुमचं तुम्ही बोला" असे म्हणाले. त्यावेळी मी "हे आता सर्कल साहेबांना दिलं, त्याच्यात कोण कोण हाय, नाही परत आणि सारखं" असे म्हणालो त्यावेळी योगेश नाय नाय तुम्ही एकदा दिलसा की तुमचा विषय मिटला तुमचं कामच झालं ओ तुम्हाला सात बाराच देणार आम्ही तुमच्या आईच्या नावावर 20 गुंठं झालेलं असे म्हणाले त्यानंतर आमचेत कामाचे अनुषंगाने आणखी बोलने झाले. त्यावेळी योगश याने बंदया इकडे ये असे म्हणुन बंदु यांना बोलावुन घेवुन त्यास यांना काल बोलेलो मी त्यात जरा हे असे म्हणाले. त्यावेळी बंदु कुणाच असे म्हणाले. त्यावेळी योगेश "ते घाटगे" असे म्हणाले. त्यावेळी बंदु आणि योगश यांचेत माझे कामाचे अनुषंगाने बोलने झाले. त्यावेळी बंदु "साहेबांनी किती सांगितलेलं" असे म्हणाले त्यावेळी योगेश "अडीच हजार "असे म्हणाले त्यावेळी बंदु यांनी मला अडीच हजार सांगितलय काय असे म्हणुन "ते किती देणार हाय, तुमची काय इच्छा हाय" असे म्हणाले त्यावेळी मी "काय तर.." असे म्हणाला.◌ं त्यावेळी बंदु "तुम्ही सांगा मी बोलतो साहेबांना" असे म्हणुन योगेश याचे मागणीस दुजोरा दिला. त्यावेळी मी "बघुया की साहेब काय म्हत्यात बघूया" असे म्हणालो. त्यानंतर आम्ही सर्कल साहेबांना भेटायला आत जात असताना मला योगेश याने एका ठिकाणी थांबविले त्यानंतर बंदु व योगेश आत गेले त्यानंतर काहीवेळाने ते बाहेर आले त्यावेळी योगेश याने मला "ओ सरकार, सर्कल साहेबांनी दोन हजार रूपय" असे म्हणाले. त्यावेळी योगेश मला "दोन हजार रूपये आणून दया, दया मग विषय नाय" असे म्हणाले त्यावेळी मी कुणाला असे म्हणालो. त्यावेळी योगेश "साहेबांना" असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना साहेबांना भेटतो असे म्हणालो. त्यानंतर मी माळगे साहेबांना भेटलो त्यावेळी मी माळगे यांना "दोन मिनट बोलुया" असे म्हणालो. त्यावेळी माळगे यांनी माझेकडे हाताची दोन बोटे केली व माळगे यांनी त्याचा हात योगेश कडे करत मला "त्याला दया" असे म्हणाले. त्यावेळी मी "योगेशकडे देवू" असे म्हणालो. त्यावेळी माळगे " योगेशकडे हं " असे म्हणुन योगेशकडे पैसे देण्यास होकार दिला त्यानंतर मी व योगेश माझे कामाविषयी बोलत बोलत बाहेर आलो. मी व पंच परत येवुन साळुंके साहेबांना हकीकत सांगितली.

त्यानंतर साळुंके साहेब यांनी मंडल अधिकारी माळगे यांना भेटवयाचे आहे त्याअनुषंगाने सुचना दिल्या. त्यांचेकडील व्हाईस रेका◌ॅर्डर चालु करून तो माझ्या गळ्यात अडकवुन मला व पंच नं.1 गवते यांना मंडळ अधिकारी कार्यालय कोडोली येथे पाठवुन दिले. आम्ही कार्यालयात गेलो त्यावेळी मी माळगे साहेबांना भेटुन माझे कामाविषयी बोललो. त्यावेळी मी माळगे यांना "ते योगेश ने सांगितलेलं, दोन हजार, तुम्हच्याकडं देवू का, योगेशकडं देवू" असे म्हणालो त्यावेळी माळगे यांनी योगेश याला "काय सांगायला लागल्यात" असे म्हणाले. त्यावेळी योगेश याने मला पलीकडं थांबा जरा असे म्हणाले. त्यावेळी माळगे यांनी "पलीकडं थांबा, असू दे.....पलीकडं थांबा" असे म्हणाले. माझेकडे येवुन योगेश याने मला साहेबांना काय बोलला असे विचारले त्यावेळी मी त्यांना दोन हजार तुम्हच्याकडं देवू का योगेश कडं असे बोलल्याचे सांगितले. त्यावेळी योगेश याने "दया की" म्हणुन माझेकडे पैसे मागितले. त्यावेळी मी त्यानं◌ा येतो परत असे म्हणालो. त्यानंतर परत येवुन साळुंके साहेबांना हकीकत सांगितली.

त्यानंतर साळुंके साहेब यांनी सापळा कारवाई सुरू केली. त्यावेळी साळुंके साहेब यांनी मला व पंचाना अॅथ्रासिंन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगितले. अल्ट्रा व्हायलेट दिव्याचे प्रकाशात निळसर चकाकी दिसलेबाबत खात्री करून सापळा कारवाईचे अनुषंगाने सापळा पुर्व संपुर्ण कार्यवाही केलेनंतर अॅथ्रासिन लावलेले 2,000/- रूपये माझे शर्टचे वरच्या डाव्या खिशात ठेवुन मला व पंचाना योग्य त्या सुचना देत असताना योगेश याचा मला त्याचे वरील मोबाईल नंबर वरून फोन आला त्याने मला किती वेळ लागेल म्हणुन विचारले त्यावेळी मी त्याला पाच मिनीटात येत असल्याचे सांगितले. त्यानंतर पुन्हा साळुंके साहेबांनी सुचना दिल्या. त्यानंतर रेकॉर्डर सुरू करून तो माझेकडे दिला. त्यानंतर मी व पंच गवते असे माझे मोटार सायकलवरून निघालो. माझे पाठोपाठ सापळा पथक आले. त्यावेळी मी व पंच मंडळ अधिकारी कार्यालयात जावुन योगेश यांना भेटलो त्यावेळी कार्यालयात माळगे व बंदु हे दोघे ही होते. त्यावेळी मी त्या दोघांचे समोर योगेश याला 2,000/- रूपये दिले व त्याला मोजुन घ्या असे म्हणालो. त्यावेळी योगेश याने माझेकडुन पैसे घेवुन त्याचे शर्ट डावे बाजुचे खिशात ठवेले त्यावेळी आमचेत माझे कामाचे अनुषंगाने बोलने चालु असताना योगेश याला माळगे यांनी बोलावुन घेतले. त्यावेळी योगेश याने बंदु याला यांचा उतारा उदया दे असे म्हणाला. त्यावेळी बंदु याने हा असे म्हणाला त्यावेळी मी पैसे स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला असता साळुंके साहेब त्यांचा स्टाफ व पंच तेथे आले व त्यांनी लाच स्विकारलेल्या रक्कमेसह योगेश गावडे यांना पकडले. तसेच लागलीच मंडळ अधिकारी माळगे व बंदु यांना ही पकडले. सदर ठिकाणी लाचेच्या सापळ्यातील प्राथमिक तपासण्या केल्या त्यानंतर पुढील सर्व कार्यवाही कोडोली पोलीस स्टेशन मधील एक कक्ष उपलब्ध करून तेथे् पुर्ण करण्यात आली आहे. सर्कल माळगे, योगश व बंदु यांची नावे पुढीलप्रमाणे असल्याचे मला समजले आहे. 01) अरूण भानुदास माळगे, वय - 49 वर्षे, पद - मंडळ अधिकारी, कोडोली, ता. पन्हाळा, जि.कोल्हापूर रा. शिराळा नाका, कचरे गल्ली, इस्लामपूर, ता. वाळवा, जि.सांगली, 02) योगेश यशवंत गावडे, वय - 29 वर्षे, रा. शिनगारे गल्ली, कोडोली, ता. पन्हाळा, जि. सांगली, 03) सुशांत सुभाष चैगुले,वय - 30 वर्षे रा. शहापूर, ता.पन्हाळा, जि. कोल्हापूर

तरी माझे वडील आनंदराव घाटगे यांचे नावे काडोली ता.पन्हाळा येथे गट नं 1375 मधील 10 गुंठे जमिन माझी आई सौ शांता आनंदा घाटगे हीचे नावे बक्षीसपत्रव्दारे केली आहे. सदर बक्षीस पत्राची नोंद घालण्याचे काम आमचे कोडोली मंडळ अधिकारी कार्यालयात आलेनंतर बक्षीस पत्राची नोंद घालणेसाठी योगेश गावडे याने मंडळ अधिकारी माळगे व स्वतःसाठी बेकायदेशिरपणे व अप्रामाणिकपणे 2500/- रूपयांची मागणी करून तडजोडीअंती 2000/- रूपये लाचेची मागणी केली. तसेच मंडळ अधिकारी अरूण माळगे यांनी योगेश याने माझेकडे मागणी केलेली लाच रक्कम योगेश यांस देणेस बेकायदेशिरपणे समंती दिली आहे. तसेच बंदु उर्फ सुशांत चैगुले यांनी बेकायदेशिरपणे योगेश याने माझेकडे मागणी केलेल्या लाचेच्या मागणीस दुजोरा देवुन प्रोत्साहन दिले आहे म्हणुन माझी 1) अरूण भानुदास माळगे,2)योगेश यशवंत गावडे,3)सुशांत सुभाष चैगुले यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मी सांगितलेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली असुन ती मी वाचुन पाहिली असता ती खरी व बरोबर आहे.

समक्ष

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

ARVIND NARAYAN RAYBOLE(Dy. SP (Deputy Superintendant of Police)) / or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):
A.A. [signature]

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

[signature]
ठाणे अंमलदार
कोडोली पोलीस ठाणे

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** ARVIND NARAYAN R
**Rank(पद):** Dy. SP (Deputy Super
**No.(सं.):**